(२०९)

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
सत्ताविसाव्या स्थगित बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : ४ मार्च, १९८३ (शुक्रवार)

वेळ : सकाळी ११.०० वाजता.

सभास्थान : समिती कक्ष, (सहावा मजला), मंत्रालय, मुंबई.

या बैठकीस उपस्थित राहिलेल्या सदस्यांची यादी जोडपत्राच्या स्वरुपात सोबत जोडली आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे विद्यमान अध्यक्ष श्री.रामराव वा.आदिक यांनी राज्याचे उप मुख्य मंत्री व नगर विकास मंत्री म्हणून अधिकारग्रहण केल्यानंतर प्राधिकरणाच्या या बैठकीस ते प्रथमच उपस्थित होते. महानगर आयुक्तांनी प्रारंभी अध्यक्षांचे स्वागत केले.

प्राधिकरणावर नवीन सदस्य म्हणून आलेले सर्वश्री वित्त मंत्री सुशीलकुमार शिंदे, गृहनिर्माण मंत्री नरेंद्र मा.कांबळे व नगर विकास खात्याचे राज्यमंत्री चंद्रकांत त्रिपाठी यांचे प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी हार्दिक स्वागत केले. तसेच प्राधिकरणाच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभा दे.पाटील व भूतपूर्व सदस्य सर्वश्री बनवारीलाल भ.पुरोहित, व्ही.सुब्रमण्यम्, विलासराव देशमुख आणि नरेंद्र म .तिडके यांनी केलेल्या कार्याचाही अध्यक्ष श्री.आदिक यांनी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला.

कार्यसूचीवरील कामकाजावर विचारविमर्श होण्याआधी काही सदस्यांनी, मुंबई महानगर प्रदेशातील भू-अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे व त्याच्या बरोबरीने अतिक्रमणाचे कृत्य हा दखलपात्र गुन्हा ठरविणे आणि त्या संदर्भात योग्य कारवाई करण्यासाठी स्वतंत्र पोलीस पथ उपलब्ध करुन देणे वगैरे पूरक प्रश्नांवर चर्चा करण्याकरिता प्राधिकरणाची एक विशेष बैठक बोलावण्याचे मान्य झालेले असतानाही अशी बैठक अद्याप न भरविल्याचे मत व्यक्त केले. सदर बैठक लवकरात लवकर बोलवावी म्हणजे विषयाच्या अनुलक्षाने अनुरुप विधेयक विधान मंडळाच्या आगामी अधिवेशनात मंजूर करवून घेण्याची शासनाला विनंती करता येईल अशीही इच्छा यावेळी प्रदर्शित करण्यात आली.

उपरिनिर्दिष्ट विषयांवर पुनश्च सखोल चर्चा झाली त्यावेळी वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'जी' ब्लॉकमध्ये विशेषतः यापूर्वी सिडकोने पुनः-प्रापित केलेल्या क्षेत्रात अतिक्रमणे झाल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणले.

....२/-

सदर भागात गॅरेजेस, भंगार मालाचे व्यापारी, अस्थि आगार आदींच्या बाबतीत न्यायालयाने व्यादेश दिलेला आहे. परंतु सदर व्यवहाराशी संबंधित मालाची ने-आण करण्यासाठी वापरली जाणारी वाहने वांद्रे-कुर्ला समूहात प्राधिकरणाच्या जमिनीवरुन ये-जा करीतच असतात. म्हणून अशा वाहनांचा प्रवेश रोखण्याची बैठकीत सूचना करण्यांत आली.

या विषयावरील चर्चेच्या समारोपात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष तथा नगरविकास राज्यमंत्र्यांनी राज्याचे गृह सचिव, विधी सचिव, मुंबईचे पोलीस आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी आणि अन्य संबंधित अधिकाऱ्यांची एक बैठक बोलावून उपरोक्त विषयांवर विचारविमर्श घडवून आणावा असे मान्य करण्यात आले.

त्या शिवाय, याच विषयांवर चर्चा करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची एक विशेष बैठकही बुधवार दिनांक २३ मार्च १९८३ रोजी सकाळी आयोजित करण्याचे यावेळी ठरले. या विशेष बैठकीस राज्याचे गृह राज्यमंत्री, विशेष गृह सचिव, विधि व न्याय विभागाचे सचिव, सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अन्य संबंधित अधिकाऱ्यांना विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रण देण्यात यावे असेही ठरले.

प्राधिकरणाच्या मागील दोन-तीन बैठकांत मुंबईच्या पाणी पुरवठयास हितावह असलेल्या मध्य वैतरणा प्रकल्पाची द्रुत गतीने कार्यवाही व्हावी म्हणून ज्या सूचना करण्यात आल्या त्या संदर्भात काही सदस्यांनी चर्चा उपस्थित केली. महानगरपालिका आयुक्तांनी सदर विषयावर तयार केलेली एक टिप्पणी प्राधिकरणाच्या सदस्यांना प्रसारित करण्याचे मान्य होऊनही अद्याप ती टिप्पणी प्रसारित झाली नसल्याचे बैठकीत बोलून दाखविण्यात आले. मध्य वैतरणा प्रकल्पाच्या अंमल-बजावणीसाठी लागणारा निधी राज्य शासन आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी उपलब्ध करुन द्यावा अशीही यावेळी सूचना करण्यात आली.

तथापि, सध्या आर्थिक चणचणीमुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण किंवा राज्य शासनही निधी उपलब्ध करु शकणार नाहीत असे या संदर्भात स्पष्ट करण्यात आले. परंतु मुंबई पाणी

.....3/-

पुरवठयाच्या पहिल्या टप्प्यासाठी (जो यापूर्वीच पूर्ण झाला आहे) जागतिक बँकेकडून मिळालेल्या अर्थसहाय्याचा संपूर्ण निधी आणि या प्रकल्पासाठी शासनाचे अर्थसहाय्य ही दोन्ही सदर प्रकल्पाच्या प्रयोजनार्थ वळविण्याच्या सूचनेवर विचार करण्याचे मान्य करण्यात आले.

मध्य वैतरणा प्रकल्पावर महानगरपालिका आयुक्तानी तयार केलेली टिप्पणी प्राधिकरणाच्या सदस्याना सत्वर प्रसारित करण्याचे याप्रसंगी मान्य करण्यात आले.

त्यानंतर कार्यसूचीवरील विचारविमर्श न झालेल्या बाबी विचारात घेण्यात आल्या.

बाब क्र.७ : जागतिक बँकेच्या सहाय्याने मुंबई महानगर प्रदेशात गरिबांना परवडेल असा निवारा कार्यक्रम.

---

प्रस्तुत बाब महानगर आयुक्तानी बैठकीत सादर केली.

या बाबीवर झालेल्या चर्चेत पुढील सूचना करण्यांत आल्या :-

(१) मध्य रेल्वेच्या धावमार्गाच्या (ट्रॅक) बाजूस मिठागरांच्या जमिनी आहेत. या जमिनींचा गृहबांधणी, पुनर्वसनादी कामासाठी उपयोग करण्यात यावा अशी सूचना करण्यात आली असता या जमिनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरित करणार असल्याच्या केंद्र सरकारच्या घोषणेकडे लक्ष वेधण्यात आले.

(२) बृहन्मुंबईच्या विकास आराखडयात नागरिकांना सुविधा पुरविण्यासाठी आरक्षित दाखविलेल्या मिठागरांच्या जमिनी मुंबई महानगर पालिकेला उपलब्ध करुन दिल्या नसल्याची तक्रार काही सदस्यानी केली. यावर प्राधिकरणाच्या अध्यक्षानी अशा जमिनींची सूची मुंबई महानगरपालिकेने आपणास सादर करावी असे सुचविले.

(३) बृहन्मुंबईत भू-खंड व सेवा कार्यक्रमाखाली ४० हजार युनिटसाठी लागणारी जमीन अतिक्रमण मुक्त आहे का, अशीही पृच्छा बैठकीत करण्यात आली असता अशा जमिनीचे सर्वेक्षण यापूर्वीच करण्यात आल्याचा खुलासा करण्यात आला. या जमिनी दलदलयुक्त व सखल स्तराच्या भागात असल्याने त्या सध्या अतिक्रमण-मुक्त आहेत. परंतु या जमिनींची लवकरात लवकर पहाणी करण्यात यावी अशी इच्छा सदस्यानी व्यक्त केली.

(४) या प्रकल्पाकरिता केंद्र सरकारकडून २० कलमी कार्यक्रमाखाली साहय मिळविण्यात यावे, अशीही सूचना करण्यात आली.

(५) बृहन्मुंबईच्या अल्प उत्पन्न क्षेत्रासाठी असलेल्या संकल्पित घन कचरा व्यवस्थापन कार्यक्रमाचा निर्देश करुन सदस्यानी त्याचा तपशील जाणून घेण्याची इच्छा व्यक्त केली आणि वरळी येथे बसविण्यात आलेले पथदर्शक भस्मीकरण यंत्र कार्यप्रवणात अपेशी ठरण्याचे आढळून आले आहे, याकडे त्यानी लक्ष वेधले.

(६) सदर प्रकल्पाची सविस्तर माहिती आपल्याला मिळावी अशीही इच्छा सदस्यानी प्रदर्शित केली.

उपरोक्त मुददयाच्या अधीन राहून प्राधिकरणाने बाबीची नोंद घेतली.

<u>बाब क्र. १० :</u> मुंबई महानगर प्रदेशाच्या विस्तारित (पेण-अलिबाग) क्षेत्रासाठी प्रादेशिक प्रारुप आराखडयास मान्यता

या बाबीवरील चर्चेत भाग घेतलेल्या सदस्यानी पुढील मुद्दे उपस्थित केले :-

(१) पेण-अलिबागच्या प्रारुप प्रादेशिक आराखडयात पाणी पुरवठयासाठी काही जलोगमांचा उल्लेख असल्याचा बैठकीत निर्देश करण्यात आला. तथापि जसा जसा काळ उलटेल, त्यानुसार विविध नगरांची व गांवांची पाण्याची गरज किती राहील याचा तसेच जलोगमांचे सविस्तर वाटप यांचा त्यात उल्लेख नाही. म्हणून सदर माहिती उपलब्ध करुन दिली जावी अशी इच्छा सदस्यानी प्रदर्शित केली.

(२) या भागाच्या विकास प्रक्रियेत स्थानिक जनतेस रोजगार आदी सुविधा देऊन सक्रीयत: सहभागी करुन घेतले जावे अशीही सूचना करण्यात आली. या संदर्भात थळ-वायशेत येथील खत निर्मिती प्रकल्पाच्या संदर्भ देऊन या प्रकल्पाच्या कामावरील ९५ टक्के मजूरवर्ग महानगर प्रदेशाबाहेरील असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

<u>ठराव क्र.२१३ :</u>

"<u>असा ठराव मंजूर करण्यांत येत आहे की,</u> मुंबई महानगर प्रदेशाच्या विस्तारित (पेण-अलिबाग) क्षेत्राकरिता १९८१-२००१ या कालावधीसाठी तयार करण्यात आलेले प्रारुप प्रस्ताव प्रकाशित करण्यास हे प्राधिकरण मान्यता देत आहे.

त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की,

महानगर आयुक्तांना पुढील बाबीसाठी प्राधिकृत करण्यात येत आहे :

(१) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व नियमन अधिनियम १९६६ च्या कलम १६ आणि त्या खालील नियमांमध्ये ठरवून दिलेल्या पध्दतीने सूचना आणि आक्षेप मागविण्यासाठी आराखडा प्रसिध्द करणे,

(२) सूचना व आक्षेपांवर आधारित प्रादेशिक नगर रचना समितीचा अहवाल विचारात घेतल्यावर आवश्यक असल्यास हा प्रादेशिक आराखडा योग्य तो फेरफार करुन शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे.

शिवाय आणखी असा ठराव मंजूर करण्यांत येत आहे की, प्राधिकरण पुढील सदस्यांचा समावेश असलेली प्रादेशिक नगर रचना समिति नियुक्त करीत आहे:. (१) अध्यक्ष, सिडको, (२) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि (३) सदस्य-सचिव, गृहनिर्माण नागरी नूतनीकरण व परिसर विज्ञान मंडळ ( उक्त अधिनियमाचे कलम १०(३) खाली नगर रचना अधिकारी म्हणून ).

<u>बाब क्र.१२ : वार्षिक कार्य-कार्यक्रम १९८३-८४</u>

उपरोक्त बाबीवर झालेल्या चर्चेच्या ओघात पुढील मुद्दे मांडण्यात आले :-

(१) मुंबई महानगर पालिकेच्या 'क' वॉर्डमध्ये असलेली कापडाची घाऊक बाजारपेठ वांद्रे-कुर्ला समूहात स्थलांतरित करण्यासाठी कार्य-कार्यक्रमात तरतूद करण्यात आली. असल्याची नोंद घेण्यात आली. परंतु फळ व भाजीपाल्याची घाऊक बाजारपेठही वांद्रे-कुर्ला समूहात हलविण्याचे आश्वासन शासनाने बऱ्याच काळापूर्वी दिलेले असूनही त्यासाठी वार्षिक कार्य-कार्यक्रमात तरतूद करण्यात आलेली नाही. सदर बाजारपेठेच्या स्थलांतराचा प्रश्न अद्याप शासनाच्या विचाराधीन असल्याची माहिती अध्यक्षानी बैठकीत दिली.

(२) बृहन्मुंबईतील ग्राम सुधार योजनेचा चर्चेत उल्लेख झाला असता प्रस्तावित सुविधांच्या तरतुदीसाठी आराखडे व खर्चाचे अंदाज अद्याप तयार नसल्याचा विचार व्यक्त करण्यात आला. नागरी सुविधांची तरतूद करण्यासाठी आवश्यक कामाला गती देण्यात यावी म्हणजे १९८३-८४ वर्षासाठी सदर कामासाठी करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीचा विनियोग करता येईल.

त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२१४ :

" असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, (अ) या टिप्पणीसह सादर केलेला १९८३-८४ सालचा वार्षिक कामाचा कार्यक्रम संमत करण्यात येत आहे आणि..

(ब) वार्षिक कामाच्या कार्यक्रमात अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशीलाला मान्यता देण्यास स्थायी समितीला याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.१३ : वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज (१९८३-८४)

सदर बाब विचारात घेऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.२१५ :

असा ठराव मंजूर करण्यांत येत आहे की, वित्तीय वर्ष १९८३-८४ सालाचा अर्थसंकल्प आणि १९८२-८३ सालचे सुधारित अंदाज यातील महानगर प्राधिकरणाच्या जमा आणि संवित्तरीत रक्कमा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम २३ (१) खाली मंजूर करण्यांत येत आहेत.

शिवाय असा ठराव करण्यांत येत आहे की, प्राधिकरण याव्दारे स्थायी समितीला योजना, सर्वेक्षण इ., कार्यक्रम अहवालात समाविष्ट न केलेल्या आणि प्रत्येकी अंदाजे रुपये १० लाखापेक्षां अधिक खर्च नसलेल्या बाबींना मंजूरी देण्याचा आणि या मर्यादेपेक्षा अधिक नसलेला व मान्य अर्थसंकल्पात तरतूद न केलेला कोणताही खर्च करण्याचा अधिकार अशा प्रकरणांचा अहवाल आगामी बैठकीत प्राधिकरणाला सादर करण्याच्या अटींवर देण्यांत येत आहे.

शिवाय असा ठराव करण्यांत येत आहे की, संबंधित कार्यकारी मंडळाना सर्वेक्षणे व अन्वेषणांचा अंतर्भाव असलेल्या आणि अर्थसंकल्पात तरतूद करण्यांत आलेल्या योजनेचा तपशिल मंजूर करण्याचा अधिकार देण्यांत येत आहे.

शिवाय असा ठराव करण्यांत येत आहे की, पद-निर्मितीस मंजूरी देण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याना अर्थसंकल्पाच्या

....७/-

आस्थापना सूचीत समाविष्ट नसलेली पदे निर्माण करण्यास, त्या पदांचा खर्च अर्थसंकल्पातील कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यासाठी केलेल्या एकूण तरतुदीतून भागविण्याच्या अटीवर प्राधिकृत करण्यांत येत आहे.

बाब क्र.१५ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्थायी समितीवर तीन सदस्यांची नियुक्ती

या बाबीवर विचारविमर्श करण्याचे पुनश्च लांबणीवर टाकण्यात आले.

यावेळी भायंदरला मुंबई महानगरपालिकेतर्फे पाणी पुरवठा करण्याचा प्रश्नही उपस्थित करण्यात आला. भायंदर भागास प्रतिदिन ५० हजार गॅलन पाणी पुरवठा करण्याचे मुंबई महानगर पालिकेने यापूर्वीच मान्य केल्याचे निदर्शनास आणून मुंबई महानगरपालिकेने शब्दपूर्ती करण्यासाठी तिचे मन वळविण्यात यावे अशी विनंती करण्यात आली. यावेळी आयुक्त, मुंबई महानगरपालिका यानी ही महानगरपालिका तिच्या 'पी' आणि 'आर' वॉर्डमधील भागाना सद्यस्थितीत पाणी पुरवठा करु शकत नसल्याचे व याच कारणास्तव सदर भागासाठी कार्यारंभ प्रमाणपत्रेही निर्गमित केली जात नसल्याचे स्पष्टीकरण केले. मुंबई महानगर पालिकेलाही सर्वसाधारणतः पाण्याच्या टंचाईची तीव्रता जाणवत असल्याने महानगर पालिका सद्यस्थितीत वचनपूर्ती करु शकत नसल्याचे आयुक्तानी सांगितले.

सभा अध्यक्षांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

-------

जोडपत्र....

(९१७)

जोडपत्र

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची
सत्तावीसावी स्थगित बैठक

दिनांक : ४ मार्च, १९८३.

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रामराव वा. आदिक,<br>उप मुख्यमंत्री आणि नगर विकास<br>मंत्री. | अध्यक्ष |
| २) | श्री.चंद्रकांत त्रिपाठी,<br>नगरविकास राज्यमंत्री, | उपाध्यक्ष, |
| ३) | डॉ.प्रभाकर पै,<br>मुंबईचे महापौर, | उपाध्यक्ष |
| ४) | श्री.नरेंद्र म. कांबळे,<br>गृहनिर्माण मंत्री. | सदस्य |
| ५) | श्री.मिठालाल जैन,<br>अध्यक्ष,ठाणे जिल्हा परिषद, | सदस्य |
| ६) | श्री.एकनाथ रा.कोपर्डे,<br>अध्यक्ष,स्थायी समिती,<br>मुंबई महानगरपालिका. | सदस्य |
| ७) | श्री.वि.धों.झुटे,<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| ८) | श्री.वि.ग.धारप,<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| ९) | श्री.अमरनाथ वा.पाटील,<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| १०) | श्री. छगन भुजबळ,<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| ११) | डॉ. अ.ऊ.मेमन,<br>नगरसेवक, मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| १२) | श्री.प्र.ह.अडवाणी,<br>अध्यक्ष,उल्हासनगर पालिका परिषद, | सदस्य |
| १३) | श्री.युसूफ हाफीज,<br>विधान सभा सदस्य | सदस्य |
| १४) | श्री.गौरीशंकर स.त्रिवेदी,<br>विधान सभा सदस्य, | सदस्य |

...२/-

१५) श्री.राम नाईक, सदस्य
विधान सभा सदस्य.

१६) श्री.तुकाराम सुर्वे, सदस्य
विधान सभा सदस्य

१७) श्री.राम महाडिक, सदस्य
अध्यक्ष, सिडको.

१८) श्री.द.म.सुकथनकर, सदस्य
आयुक्त, मुंबई महानगरपालिका

१९) श्री.अ.ना.बटब्याल, सदस्य-सचिव,
महानगर आयुक्त,
मुंबई महानगर प्रदेश विकास
प्राधिकरण.

निमंत्रित :

१) श्री.स.शं.तिनाईकर,
राज्य शासनाचे सचिव,
गृहनिर्माण व विशेष
सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई.

MINUTES OF THE ADJOURNED TWENTY-SEVENTH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 4th March, 1983 (Friday)

TIME : 11.30 A.M.

PLACE : Committee Room (6th Floor), Mantralaya, Bombay.

A list of Members present is enclosed (Annexure).

At the outset, the Metropolitan Commissioner welcomed Shri Ramrao W. Adik, Chairman, BMRDA who was attending the meeting of the Authority for the first time after his appointment as the Deputy Chief Minister and Minister for Urban Development.

The Chairman then cordially welcomed Shri Sushilkumar Shinde, Minister for Finance; Shri N.M. Kamble, Minister for Housing and Shri Chandrakant Tripathi, Minister of State for Urban Development and placed on record the appreciation of services of the ex-Chairman, Smt. Pratibha D. Patil and outgoing Members - Shri Banwarilal B. Purohit, Shri V. Subramanian, Shri Vilasrao Deshmukh and Shri N.M. Tidke.

Before the business on the Agenda was taken up for consideration, some Members observed that eventhough it was agreed to convene a special meeting of the Authority for discussing the question of encroachment of land and unauthorised construction in Bombay Metropolitan Region together with its allied issues such as making encroachment a cognizable offence, making separate Police Squad available for taking action in this respect, such a meeting was not convened. It was desired that the said Meeting be called early so that Government might be requested to get passed the necessary legislation in the ensuing session of the Legislature.

The abovementioned issues were again discussed at length during the course of which Members pointed out encroachments in 'G' Block of Bandra-Kurla Complex, particularly the area earlier reclaimed by CIDCO. It was observed that in respect of encroachments made by garrages, scrap dealers, storage of bones etc., the Court has given injunction. However, vehicles used in these activities pass through the land of the BMRDA in Bandra-Kurla Complex.

It .....

It was, therefore, suggested that entry of these vehicles be checked.

At the conclusion of the discussion on this issue, it was agreed that Vice-Chairman, BMRDA and Minister of State for Urban Development should convene a meeting of the Home Secretary; Law Secretary; the Commissioner of Police, Bombay; BMRDA Officers and other concerned officers and give thought to the issues mentioned above.

It was also decided that a special meeting of the Authority be convened on Wednesday, the 23rd March, 1983 at 11.00 a.m. to discuss these issues. The Minister of State for Home; the Special Secretary, Home; the Secretary, Law and Judiciary; the Secretary, Public Works Department and other concerned officers be requested to attend this meeting as special invitees.

Refering to the suggestions made during the last 2-3 meetings of the Authority regarding expediting execution of Middle Vaitarna Project in the interest of Bombay's water supply, some Members raised a discussion. It was observed that the Note prepared by the Municipal Commissioner for Greater Bombay which was agreed to be circulated to the Members of the BMRDA was not circulated so far. Suggestion was made that the State Government and the BMRDA should make available part of the funds required for execution of Middle Vaitarna Project.

It was made clear that neither the BMRDA nor the State Government could in the present financial stringency make available any finance. However, the suggestion that efforts be made to pass on the entire proceeds of loan assistance received from I.D.A. for Bombay Water Supply-I (which is already completed) and the State Government's assistance for the said Project, was agreed to be given due consideration. Municipal Commissioner's note on the Middle Vaitarna Project was agreed to be circulated to Members immediately.

The undisposed items on the Agenda were then taken up for consideration.

Item No. 7 : .....

221

**Item No. 7 : Affordable Low Income Shelter Programme in B.M.R. with the World Bank Assistance.**

The Metropolitan Commissioner introduced the Item to the meeting.

During the course of discussion on this item, the following suggestions were made :-

(1) There are many salt-pan lands by the side of Central Railway tracks which should be made available for housing/rehousing purpose. In this connection a reference was made to the announcement made by the Central Government that these lands would be passed on to the Maharashtra Housing and Area Development Authority.

(2) Some Members complained that salt-pan lands which are reserved in the Development Plan of Greater Bombay for providing amenities to the citizens, are not made available to the Bombay Municipal Corporation. The Chairman, BMRDA suggested that a list of such lands be furnished by Bombay Municipal Corporation to him.

(3) It was enquired whether the land required for providing 40,000 units under sites and services programme in Greater Bombay is available without any encroachment. It was clarified that survey of such lands has already been made. These lands are presently available without any encroachment as they are marshy and low lying. Members however, desired to inspect such lands at an early date.

(4) It was suggested that assistance from the Central Government under 20 Point Programme be sought for for this project.

(5) Refering to the proposed Solid Waste Management Programme in Low Income areas of Greater Bombay, Members sought details thereof and pointed out that Pilot Incinerator erected by the Bombay Municipal Corporation at Worli has proved to be a failure.

(6) Members .....

(6) Members desired that details of the project be made available to them.

Subject to the above, the item was noted by the Authority.

Item No.10 : Draft Regional Plan for the extended Bombay Metropolitan Region (Pen-Alibag) - Approval to the -

Members participating in the discussion on this Item raised the following points :-

(1) It was pointed out that in the Draft Regional Plan of Pen-Alibag some sources of water supply are mentioned. Detailed future demands of different towns and village in the course of time and detailed allocation of resources were not given. Members desired that this information should be made available to them.

(2) It was suggested that in the process of development of this region, co-operation of the local people should be solicited by giving them jobs, etc. In this context, a reference was made to the Fertilizer Project at Thal-Vaishet and it was observed that 95% labourers engaged on this project are from outside the region.

The Authority then adopted the following Resolution :-

RESOLUTION NO.213 :

Resolved that the Authority hereby approves the draft proposals 1981-2001 for the extended Bombay Metropolitan Region (Pen-Alibag) for publication.

Resolved further that the Metropolitan Commissioner is authorised -

i) to publish the Plan in the prescribed manner as per Section 16 of the M.R.T.P. Act, 1966, and the rules thereunder for inviting suggestions and objections;

ii) to submit the Regional Plan with modification, if necessary, to Government for approval after considering the Report of the "Regional Planning Committee" on the suggestions and objections.

Resolved .....

Resolved further that the Authority appoints the Regional Planning Committee consisting of (i) the Chairman, CIDCO; (ii) the Metropolitan Commissioner, BMRDA, and (iii) the Member-Secretary, HURE Board (as Town Planning Officer under Section 10(3) of the said Act).

Item No.12 : Annual Works Programme 1983-84.

During the course of discussion on this item, the following points were made :-

(1) It was observed that in the Works Programme, a provision has been made for shifting of wholesale textile market located in 'C' Ward of Bombay Municipal Corporation to the Bandra-Kurla Complex. Eventhough, Government had long back assured that fruit and vegetable wholesale market would be shifted to Bandra-Kurla Complex, no provision therefor has been made in the Annual Works Programme. The Chairman informed the meeting that this issue is still under Government's consideration.

(2) Refering to village improvement scheme in Greater Bombay, it was observed that plans and estimates for providing the proposed amenities are still not ready. It was urged that this should be expedited so that the amount allocated for the year 1983-84 could be spent for providing civic amenities.

The Authority then passed the following Resolution :-

RESOLUTION NO.214 :

Resolved that (a) the Annual Works Programme for the year 1983-84 presented with this note is approved and (b) the Standing Committee is hereby authorised to accord approval to the details of the schemes included in the Annual Works Programme.

Item No.13 : Annual Budget Estimates for 1983-84.

The Authority considered the Item and passed the

following .....

following Resolution :-

RESOLUTION NO.215 :

Resolved that the Annual Budget Estimates in respect of the financial year 1983-84 and the Revised Estimates for 1982-83 showing estimates receipts and disbursements of the Metropolitan Authority, are approved under Section 23(1) of the BMRDA Act, 1974.

Resolved further that the Authority do hereby delegate the power to the Standing Committee to sanction schemes, surveys, etc., not included in the Works Programme, estimated to cost not more than Rs.10 lakhs in each case and to authorise the incurring of any expenditure not exceeding the same limit, in respect of which provision has not been made in the approved budget, subject to a report of such cases being made to the Authority at the next meeting.

Resolved further that the respective Functional Boards are authorised to sanction the details of the schemes involving surveys and investigations for which provision has been made in the budget.

Resolved further that the authorities competent to sanction the creation of posts are authorised to create posts, which are not included in the establishment schedule to the budget provided that the expenditure on such posts can be met from the total provision for salaries and allowances to the staff made in the budget.

Item No.15 : Appointment of three Members on the Standing Committee of the B.M.R.D.A.

Consideration of this Item was again deferred.

At this stage, issue regarding water supply to Bhayander by the Bombay Municipal Corporation was raised. Pointing out that Bombay Municipal Corporation had agreed to supply 50,000 gallons of water per day to Bhayander area, it was requested that the Bombay Municipal Corporation should be prevailed upon to observe the agreement. The Municipal Commissioner, Bombay Municipal Corporation explained that presently the Bombay Municipal Corporation is not in a position to supply

water .....

water to its areas in 'P' and 'R' Wards and Commencement Certificates for constructions in this area are also not issued on this account. Due to the general scarcity of water with Bombay Municipal Corporation, Municipal Commissioner expressed his inability to fulfil the commitment.

The meeting then concluded after a vote thanks to the Chair.

§§§§§§§§§§§§§§§

ANNEXURE .....

ukd:16383.

ANNEXURE

ADJOURNED 27TH MEETING OF THE B.M.R.D.A.

DATE : 4th March, 1983.

MEMBERS PRESENT :

| | | |
|---|---|---|
| 1) | Shri Ramrao W. Adik, Dy. Chief Minister and Minister for Urban Development. | - Chairman. |
| 2) | Shri Chandrakant Tripathi, Minister of State for Urban Development. | - Vice-Chairman. |
| 3) | Dr. Prabhakar S. Pai, Mayor of Bombay. | - Member. |
| 4) | Shri N.M. Kamble, Minister for Housing. | - Member. |
| 5) | Shri Mithalal R. Jain, President, Thane Zilla Parishad. | - Member. |
| 6) | Shri Eknath R. Koparde, Chairman, Standing Committee, B.M.C. | - Member. |
| 7) | Shri B.D. Zute, Councillor, B.M.C. | - Member. |
| 8) | Shri V.G. Dharap, Councillor, B.M.C. | - Member. |
| 9) | Shri Amarnath W. Patil, Councillor, B.M.C. | - Member. |
| 10) | Shri C.C. Bhujbal, Councillor, B.M.C. | - Member. |
| 11) | Dr. A.U. Memon, Councillor, B.M.C. | - Member. |
| 12) | Shri P.H. Advani, President, Ulhasnagar Municipal Council. | - Member. |
| 13) | Shri Usuf Haffiz, M.L.A. | - Member. |

14) Shri G.S. Trivedi .....

14) Shri G.S. Trivedi, M.L.A. - Member.

15) Shri Ram Naik, M.L.A. - Member.

16) Shri T.E. Surve, M.L.A. - Member.

17) Shri Ram Mahadik, Chairman, C.I.D.C.O. - Member.

18) Shri D.M. Sukthankar, Municipal Commissioner, B.M.C. - Member.

19) Shri A.N. Batabyal, Metropolitan Commissioner, B.M.R.D.A. - Member-Secretary.

INVITEES :

1) Shri S.S. Tinaikar,
Secretary to Government,
Housing and Special Assistance
Department, Mantralaya,
Bombay.

-.-.-.-.-.-.-.-.-.-

ukd:16383.